Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९
ई बालभारती शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 Fax : 25665807 &
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्वाचे / परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं/ परीक्षा-३ /4999
पुणे ४११ ००४
दिनांक २७/११/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय – उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी – मार्च २०२७ परीक्षांची आवेदनपत्रे ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखांबाबत.

संदर्भ – १) रा.मं./ले.पे.६/परीक्षा शुल्क २०२५–२६/१८६५,१८६६ दिनांक. ०५/०५/२०२६ रोजीचे पत्र
२) क.रा.मं./परीक्षा–३/३४५५ दिनांक. १३/०८/२०२६ रोजीचे पत्र
३) क.रा.मं./परीक्षा–३/३५०६ दिनांक. १८/०८/२०२६ रोजीचे पत्र
४) क.रा.मं/परीक्षा–३/४६६९ दिनांक.३०/१०/२०२६ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी – मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांसाठी प्रविष्ट होणारे नियमित विद्यार्थी, तसेच पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे तसेच ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे नियमित शुल्काने सादर करण्यासाठी संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये दि. ३०/११/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या संदर्भात सूचित करण्यात येते की, फेब्रुवारी–मार्च २०२७ इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेसाठी आवेदनपत्र भरण्यासाठी दि.३०/११/२०२६ नंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. तरी सर्व कनिष्ठ महाविद्यालय/माध्यमिक शाळांचे, प्राचार्य/मुख्याध्यापक, विद्यार्थी, पालक व संबंधित घटकांनी याची नोंद घ्यावी. कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची सर्व संबंधीतांनी दक्षता घ्यावयाची आहे. (मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने)

(डॉ. दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ पुणे–०४

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ 4455
कोल्हापूर -416004
दिनांक:- 27 NOV 2026

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये व शाळा,
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) फेब्रुवारी-मार्च 2027 परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखांबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपल्या कनिष्ठ महाविद्यालय / शाळामधील फेब्रु./मार्च- 2027 परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्राबाबत राज्य मंडळ, पुणे यांच्या वरील प्रकटनाप्रमाणे अवगत करण्यात येत आहे.

(गजानन उकिर्डे)
प्र.विभागीय सचिव

Scanned with OKEN Scanner